Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-1 | January - 2025

Original Article

# पर्ण चित्रकलेचे साधक - श्रीधर रामचंद्र कुलकर्णी

**डॉ. व्यास सी. पी.**
के. के. एम. महाविद्यालय, मानवत जि. परभणी

**Manuscript ID:**
JRD -2025-170145
ISSN: 2230-9578

Volume 17
Issue 1|
Pp. 256-259
January 2025

**Submitted:** 06 Dec. 2024
**Revised:** 20 Dec. 2024
**Accepted:** 25 Jan. 2025
**Published:** 31 Jan. 2025

***सारांश:-***

*सौंदर्याचे रसात्मक ग्रहण म्हणजे कला. कलेचे खरे मोल कलावंत जाणतात व रसिकच तिला पारखू शकतात. कलेची विविध रूपे व विविध दालने आहेत. जगातील कलाविष्कारात वेरूळ- अजिंठा इत्यादी गुफांतील शिल्पे रंगकाम अत्यंत प्रसिद्ध. तसेच ब क ते ही क आ- वेगळे महत्त्व ठेवणारी कला ठरते. नियतीने काही मोजक्या हातांना व बोटांनाच अशा कुंचल्यांचा स्पर्श दिलेला आहे की त्यातून एक अप्रतिम व अनुपमेय अशी कला अविष्कृत होते. कलेचा चित्रकार हा प्रकार तसा जुनाच. प्राचीन गुफातून 15000 वर्षांपूर्वी पासून चित्रकला असल्याची उदाहरणे. दिस तर दीड हजार वर्ष व त्यापेक्षाही जुने बेजोड व अतिशय मौलिक रंगकाम अजिंठा येथे असल्याचे उदाहरण जगप्रसिद्ध. इतिहासात अशा कलांची उदाहरणे अमरकलाकृती ठरल्या मात्र त्यांचे निर्माते सिद्ध हस्तकलाकार मात्र अज्ञात झाले. ही फार मोठी ऐतिहासिक शोकांतिकाच होय. कारण कलाकारांना पूर्वीच्या काळी फक्त कारागिरांचाच दर्जा देऊन त्यांची कला जोपासली. मोठ-मोठे स्थाप, शिल्प वेद, चित्रकार इत्यादी सर्व यामुळेच आज इतिहासाच्या नोंदीत दिसत नाहीत.*

**प्रस्थावना:-**

पूर्वीचे कलाकार जसे इतिहासाच्या पडद्याआड गेले तसे आजच्या कलाकारांना पडद्याआड जाऊ न देता हेतूपूर्वक सर्वांसमोर प्रकट केले. स्वतःची आगळीवेगळी कला जोपासणारे तसेच एक पट्टीचे कलावंत म्हणजे श्रीधर रामचंद्र कुलकर्णी हे होत. त्यांना व त्यांच्या कलेला सर्वांसमोर सादर करण्यासाठीचा हा प्रपंच.

**पर्ण चित्र कलेचा अविष्कार-**

सर्वप्रथम परिश्रमपूर्वक हुडकून पिंपळाची भरपूर लांबी रुंदीची वाळलेली पाने गोळा करावी लागतात. नंतर त्यांना काही दिवसांसाठी एखाद्या भांड्यात पाण्यामध्ये भिजत ठेवावी लागतात. नंतर पाणी घाण किंवा चिकट झाले तर बदलावे लागते. सामान्यपणे दहा-पंधरा दिवस असे करून भिजत ठेवलेल्या पिंपळ पानांचा पापुद्रा बोटांच्या व अंगठ्याच्या हळुवार दर्शनाने काढावा लागतो. या क्रियेमध्ये फक्त पानाच्या शिरा तुटून देता कायम ठेवावे लागतात. त्यानंतरच गरज भासल्यास पुस्तकात किंवा मोठ्या कागदात त्या पानांना ठेवले म्हणजे त्यावरील पाण्याचा अंश नाहीसा होतो व ते कलाकृतीच्या योग्य होतो. मग वॉटर कलर किंवा इतर प्रकारचे रंग घेऊन त्यावर चित्रांकित करण करावयाचा आकार रख स्वरूपात पॉइंटेड ब्रशने तयार करून नंतर त्यावर अपेक्षित रंग भरावे लागतात. रंग भरतेवेळी पानाच्या खालच्या बाजूस लाटींग पेपर वापरावा लागतो जेणेकरून शिरांनी धरून ठेवलेल्या व अपेक्षित रंगापेक्षा जास्त असलेल्या रंग खालच्या ब्लास्टिंग पेपरवर खेच. अशा प्रकारे आपल्या मनात ठरलेली चित्रकृती पिंपळाच्या पानावर आपण बोलकी करू शकतो.

Quick Response Code:

Website:
https://jrdrvb.org/

DOI:10.5281/zenodo.14965148

Access this article online

*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International, The Creative Commons Attribution license allows re-distribution and re-use of a licensed work on the condition that the creator is appropriately credited*

**Address for correspondence:**
*डॉ. व्यास सी. पी. के. के. एम. महाविद्यालय, मानवत जि. परभणी*

**How to cite this article:**
*सी. पी., . व्यास . (2025). पर्ण चित्रकलेचे साधक - श्रीधर रामचंद्र कुलकर्णी. Journal of Research & Development, 17(1), 256–259. https://doi.org/10.5281/zenodo.14965148*

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-1 | January - 2025

ही सोपी वाटणारी प्रक्रिया सोपी नसून फार परिश्रमातून साध्य होणारी प्रक्रिया होय. पिंपळपानावरील रंगकाम त्यावर पातळ शिलेदार व पारदर्शक प्रकारचा कागद ठेवून दीर्घकाळ टिकविता येतात.

**अबोल कलाकार पण बोलक्या कलेचा धनी-**

श्रीधर रामचंद्र कुलकर्णी कोरफड बाबुराव कुलकर्णी यांचे वास्तव्य महाराष्ट्रातील बुलढाणा जिल्ह्यातील मेहकर या नगरीत राहिले. मेहकर नगरी म्हणजे पद्म पुरणातील मेधंकर नगरी होय. येथे भगवान विष्णूचे निधनकर राक्षसाचा वध केला होता. या नगरीला, ऐ पौराणिक व सांस्कृतिक वारसा. आहेत त्याला शोभेल असेल हे कला प्रेम श्रीराम उर्फ बाबुराव कुलकर्णी मध्ये जन्मले ते एक छंद म्हणूनच. श्रीरामपूरकर बाबुराव कुलकर्णी यांची व्यक्तिमत्व शांत व अबोल पण स्मित हास्याच्या प्रभावाने इतरांना प्रभावित करणारे राहिले. जन्मभर अनेक आर्थिक संकटांना व समस्यांना प्रामाणिकपणे तोंड देऊन जीवनाला व संघर्षाला खेळीमळीने त्यांनी विहित केले. त्यांचे कारण त्यांचा हा कुलूप पासून हिचा विरंगुळा व कला प्रेमच होय.

श्रीधर रामचंद्र कुलकर्णी यांनी राजस्व विभागात नोकरी केली व सेवानिवृत्ती प्राप्त केली त्या विभागात चा या कलेशी काहीही संबंध नसतानाही ते शासकीय नोकरी करूनही ते स्वतःचा आयुष्यभर छंद जोपासत राहिले. त्यांनी ही कला आपल्या जीवनाची एक साधना म्हणूनच जोपासली. खरे पाहता या कलेसाठी त्यांनी कोणत्याही परीक्षा, प्रशिक्षण अथवा मार्गदर्शन असे औपचारिक मार्ग हाताळले नाहीत. फक्त प्रयत्न वाळूचे काम कणगडीचा तेलही गळे या म्हणीप्रमाणे प्रयत्न व सततचा ध्यास मात्र कायम ठेवला. व ही कला जोपासत राहिले.

नियतीने त्यांना दिलेले या देणगी कृती कलेचा बहर आणण्यासाठी त्यांनी प्रयत्नांची पराकाष्टाही केली. या पिंपळ पानांच्या प्राप्तीसाठी त्यांना करावी लागणारी पायपीट, घ्यावे लागणारे परिश्रम यांच्या पूर्वीच्या यातूनच त्यांचे कला प्रेम प्रकट होते. पडकी, ओसाड क्षेत्र, पडजड झालेल्या व भयान वाटणाऱ्या विहिरी, जंगल मे भाग इत्यादीमध्ये हिंडून किंवा डोकावूनही अनेकदा पदरी पडणारी निराशाच यातून ते आशादायी पिंपळ पानावरील चित्रकला जोपासू शकले. हास्ते पर्ण चित्रकला निधी या उपाध्यक्ष पात्र ठरतात. ते नेहमी नव्या उमेदीने मोठ्यात मोठी अर्थात जास्त लांब रुंदीची पिंपळाची पाने शोधत. , जळगाव जामोद जिल्हा बुलढाणा च्या पडक्या घरात त्यांना कलानिधी आढळला त्यांनी 10" X 14" अशा रुंदी व लांबीची पिंपळाची पाने मोठ्या परिश्रमाने मिळवली. अशा आकाराची पिंपळाची पाने खरोखरच दुर्मिळ असतात जी मिळवून त्यावर स्वराज्याचे व स्वाभिमानाचे ज्वलंत व तेजपुंज स्फूर्ती स्थान बनलेले छत्रपती शिवाजी महाराज यांची बोलकी व हृदयस्पर्शी चित्रे त्यांनी आपल्या कुंचल्याच्या हळुवार स्पर्शाने फुंकर घालून चित्तारलेली आहेत त्यांच्या या कलेतील हे विशेष होय.

त्यांनी आपल्या हातून शंभर चित्रे पिंपळपानावर चित्रित करण्याचा अद्भुत संकल्प केला. या चित्रांची तीन विभागांमध्ये विभागणी केली-

1. महाराष्ट्राची भाग्यविधाता व शिवाजी महाराजांची मातोश्री माता जिजाऊ (जिजामाता, सिनखेडराजा) व त्यांच्या विषयाची प्रसंग चित्रे तसेच शिवाजी महाराजांच्या जीवनातील मोजके पण श्रृंखलाबद्ध जीवन साकार करणारे प्रसंग घेऊन तयार केलेली चित्रे या सदरात येतात. शिवाजी महाराजांच्या जन्म, त्यांचे सिंदखेड मधील वास्तव्य राज्यप्राप्ती चे प्रसंग, राज्याभिषेक व त्यांच्या महतीला वाढविणारे अनेक प्रसंग दर्शवीत शिवाजी महाराजांची यह लोक यात्रा संपेल पर्यंतच्या चित्रांना चित्तारून या कलेतील उदात्त विषयावरील त्यांची पकड ते स्पष्ट करतात.
2. दुसरा विभाग दिसतो तो व्यंगचित्रांचा. यात आमचे राष्ट्रपुरुष व- संत महा महात्म्य प्रत्य. श्री रामकृष्ण, स्वामी विवेकानंद, योगीराज श्री अरविंद घोष, डॉक्टर हेडगेवार, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर, श्रीमती इंदिरा गांधी, विनोबा भावे, राजीव गांधी इत्यादींची व्यक्तिचित्रे अत्यंत बोलकी व हृदयस्पर्शी वाटतात.
3. त्यांच्या कलेची तिसरे व विकास महान होणारे नवे दालन सुरू होते ते अजिंठ्याच्या लेण्यातील विश्वव्याख्यात पद्मपाणि बुद्धांच्या चित्राने. या आगळया- वेगळया दालनात विकसित करण्याचा त्यांचा मानस खरोखरच त्यांच्या कलेला उत्तुंग शिखरावर पोहोचविल्याशिवाय राहत नाही.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-1 | January - 2025

**श्रीधर रामचंद्र कुलकर्णी यांच्या कलेचे गुणविशेष-**

एका जन्मजात व अभिजात कलाकाराच्या हातात खरोखरच एक जादूची फुंकर घालण्याची क्षमता असते ही बाब श्रीधर रामचंद्र कुलकर्णी यांच्या चित्रपट केलेल्या व पर्ण चित्रांवरून स्पष्ट होते त्यांच्या कलेत हुबेहूबपणा, हस्त कौशल्य व निर्मितीचा बारकावा असून प्रदेश स्पर्शी ठरणाऱ्या कलेचा उच्च दर्जा आणि कलाकारांच्या मनाएवढाच पाहणाऱ्याच्या मनाला समाधान देणारी क्षमता त्यात ओथंबून भरलेली. त्यांनी केलेले रंगकाम व रेखाटन एका प्रशिक्षित व औपचारिकपणे शिकलेल्या पदवीधार पेक्षाही श्रेष्ठ वाटते. ही कला एकलव्याच्या पावलावर पाऊल टाकून आधुनिक काळामध्ये आपले वेगळेपण जोपासणारी दिसते.

**श्रीधर रामचंद्र कुलकर्णी यांची पूर्ण चित्र प्रदर्शने-**

श्रीधर रामचंद्र कुलकर्णी यांनी जोपासलेली ही कला सर्वसामान्य व्यक्ती, विद्यार्थी, कलाप्रेमी, इतिहास प्रेमी आदींसाठी आपली प्रदर्शनी भरून प्रदर्शित सुद्धा केली. त्यांच्या पिंपळपानावरील कलेच्या अविष्काराचे प्रत्यक्ष दर्शन व्हावे म्हणून लोकांनी सुद्धा त्यांना निमंत्रणे देऊन ठीक- ठिकाणी प्रदर्शने आयोजित केली. बोलावल्यानंतर लहान वस्ती असो की मोठे नगर असो, ते प्रत्येक ठिकाणी आपले पिंपळपानाचे प्रदर्शन भरवत असत. प्रदर्शन म्हणून सर्वांना आपल्या कलेचा आनंद व कलेच्या सुवासित पुष्पाने सर्वांना मंत्रमुग्ध करीत असत. प्रत्येक ठिकाणी निमंत्रण संस्था, मंडळ व संघटना, त्यांना ऐपतीप्रमाणे मानधन व जाणे-येण्याचा खर्च देत यात त्यांना ही बाब परवडत अथवा न परवडत ते स्वीकार करून आपले प्रदर्शन आपल्या कलेचा आनंद व कलेचा रसस्वाद करण्याचा अनुभव सर्वांना ते देत असत. या अबोल, ह नि वृत्तीच्या कलाकाराच्या कलेचे ते परिश्रमिक नसून आयोजकांनी यथाशक्ती केलेला तो बहुमानच होत. तसेच त्यांच्या कलेचे खरे मौल सांगणारे पुरावे म्हणजे त्यांच्याकडे संग्रहित दोन रजिस्टर मधील प्रतिक्रिया होय. पिंपळ पानावरील प्रदर्शने बुलढाणा, मेहकर, अकोला, अमरावती, व, नागपूर, पुणे, हिंगोली, मुंबई, उदगीर औराद शहाजानी, लातूर इत्यादी लहान मोठ्या शहरातून नेहमीच आयोजित करण्यात आले. ज्या जिजामातेंच्या व शिवबांच्या थोरवीला प्रदर्शित करणारी चित्रे त्यांनी साकार केली त्या जिजामातेंच्या जन्मस्थळी अर्थात सिंदखेड राजा जिल्हा बुलढाणा त्यांच्या या पिंपळ पूर्ण चित्राचे प्रदर्शन खरोखरच त्या जन्मोत्सव सोहळयातील महत्त्वाचे आकर्षण व हजारोंच्या डोळयांचे पारणे फेडणारा प्रयत्नचय. सिनखेडराजा येथील जाधव रावांच्या काळातील शिल्प, मोठमो, बारा, मंद, समाध्या व तेथील ऐतिहासिक पुरातत्वीय पुरावे यांना काही अंशाने का होईना त्यांनी आपल्या कलाविष्काराने लहान मोठ्या पिंपळपानात सुरेखपणे चितारले.

श्रीधर रामचंद्र कुलकर्णी यांचे पूर्ण चित्र प्रदर्शन शालेय तथा महाविद्यालयीन विद्यार्थ्यांपासून ते उच्च दर्जाच्या साहित्यिकांपर्यंत, नवोदित कलाकारांसाठी, सतत शिकणाऱ्या शिक्षका, चित्रकार इतिहास तज्ञा, सा, समीक्षकांसाठी व कलेचे मर्म जाणणाऱ्या उच्चपदस्थ व्यक्तींसाठी सर्वांना प्रेरणादायी ठरते.

दिनांक तीन व चार ऑक्टोबर 1990 रोजी महाराष्ट्र व कर्नाटक सीमेवर, मराठवाड्याच्या एका टोकावर असणारे औराद शहाजानी नगरीतील कलेची उपासना करणाऱ्या शार्दो पाचक शिक्षण संस्थेद्वारा संचलित मास्टर दिनानाथ मंगेशकर महाविद्यालयात श्रीधर रामचंद्र कुलकर्णी यांचे पर्ण चित्र प्रदर्शन भरवण्यात आले. या प्रदर्शनात त्या महाविद्यालयाचे तत्कालीन प्राचार्य सदस्य आर्य यांच्या परवानगीने हे प्रदर्शन भरवण्यात आले. साधारणतः वर्षभरापूर्वी दिलेले निमंत्रण स्वीकारून श्रीधर रामचंद्र कुलकर्णी अर्थात दादा यांनी निमंत्रण आनंदाने स्वीकारून वयाच्या 72 व्या वर्षी या महाविद्यालयात पूर्ण चित्र प्रदर्शन भरविले. वयाच्या 72 व्या वर्षी त्यांनी साधारणता 375 कि. मी. चे बसने प्रवास करून हे प्रदर्शन भरविले हे वैशिष्ट्यपूर्ण होईल. हे प्रदर्शन या महाविद्यालयाच्या इतिहास विभागाने व रंगकाम व चित्रकाम कला विभागातर्फे भरविण्यात आले होते. या प्रदर्शनासाठी महाविद्यालयाचे विद्यार्थी, नगरातील कलाप्रेमी, कलेचे चाहते, महादेवाचे प्राध्यापक आदींनी या या प्रदर्शनाचा आनंद घेतला. या प्रदर्शनासाठी स्वतः श्रीधर रामचंद्र कुलकर्णी हे वयाच्या 72 व्या वर्षी स्वतः उपस्थित होते. यावेळेस त्यांनी आपल्या जीवनातील चढ-उतार, आलेल्या अडचणी, आलेल्या अडचणीतून छंद रूपाने या कलेची जोपासना आदींवर चर्चा सुद्धा केली. यावेळी सदानंतर 4000 लोकांनी या प्रदर्शनाचा लाभ घेतला. हे प्रदर्शन थोरामोठ्यांना सर्वांनाच आवडले. त्यांनी नोंदविलेल्या लेखी प्रतिक्रिया मधून त्याविषयीचे समाधान

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-1 | January - 2025

आणि गुणविशेष यांची साक्ष. दे यानंतर अशीच प्रदर्शन शामलाल हायस्कूल उदगीर जिल्हा लातूर येथे 5 ऑक्टोबर 1990 ला प्रदर्शनास भरवण्यात आले. येथे ही भरपूर संख्येने लोकांनी या प्रदर्शनाचा आस्वाद घेतला.

पर्ण चित्रकला सोबतच श्रीधर रामचंद्र कुलकर्णी यांच्याकडे इतरही कला नांदल्या व वाढल्या. श्रीधर रामचंद्र कुलकर्णी हे पूर्ण चित्रकला निधी आहेतच सोबतच प्लास्टर ऑफ पॅरिसचे सुरेख गणपती बनविणे महालक्ष्मीचे मुखवटे तयार करणे व त्यांना आपल्या कुशल हातांच्या व कुंचल्याच्या स्पर्शाने रंग भरून सजीव बनविणे या कलातही ते निष्णात असल्याचे दिसते. अशा प्रकारच्या शेकडो प्रतिमा तयार करून आर्थिक अडचणीच्या काळात स्वतःच्या जीवनाला त्यांनी आर्थिक हातभार ही प्राप्त करून. सनलाइट सारख्या शाबनेपासून पेटी व तबला करून त्यात योग्य रंग भरून हुबेहूब प्रतिकृती निर्मित करण्यात ही त्यांनी ही बोटे सिद्ध हस्त होती. तसेच अंगठ्याच्या बोटांच्या ठशांनी तयार केलेल्या गणपतीचे चित्र त्यांच्याकडे संग्रही होते. जे त्यांचे नसते तरीही दुसऱ्यांच्या कलेतला शिकण्यासाठी व शिकण्यासाठी त्यांनी सोबत ठेवलेल्या होत्या.

कलेची उपासना करूनच कलाकार उत्कृष्ट उत्तम आविष्कार. मात्र आपण हे पहात असतो की त्याच्या जीवनासाठी आवश्यक असलेला पैसा अर्थात अर्थ त्याला यातूनच बऱ्याच वेळा प्राप्त होत. म्हणजे त्याची, उलट त्याचे एवढे जास्त मोल असते की ते आम्ही ओळखून त्याची कदर केलेली. मात्र क म्हणजे क क त जीव जीवनाभिमुख व अधिक फलदायी ठरते. पूर्ण चित्रांची कला व श्रीधर रामचंद्र कुलकर्णी यांच्या इतर कला अशा प्रकारे जीवन उपयोगी पार्थ प्राप्तीसाठी महत्त्वाच्या. ठर नव,, विद्यार्थ्यांनी शिक्षकांनी व कलोपासक विधवा जणांनी व टाकाऊ पासून टिकाऊ आणि कमी खर्चात उत्कृष्ट कलेच्या निर्मात्यांनी या कलेला उचलून धरले पाहिजे. खरे पाहता या कलेचा खरा आविष्कार होण्यासाठी शासनाने लक्ष याकडे पुरविले जाणे गरजेचे असते. विविध कलांचा जसा शास्त्रीय अभ्यास केला जातो तसा अभ्यासक्रमात अंतर्व केला जाणे गरजेचा असतो. सोबतच अशा कलाकारांपर्यंत गरजू होतकरू विद्यार्थ्यांनी पोहोचणे वही कला शिकणे सुद्धा तितकेच महत्त्वाचे असते ज्यातून या कलाकाराच्या नंतर सुद्धा ही कला जिवंत राहू शकते. नसता गुरु सोबत विद्याही संपणे अशा प्रकार होत असतो. कलाकारांसोबत कलाविष्कार संपणे हे सर्व श्रुत आहे. म्हणून पुनश्च एकदा म्हणावे वाटते की अशा विविध कलांपर्यंत शासन पोहोचणे व गरजवंत होतकरू विद्यार्थी पोहोचणे तितकेच गरजेचे आहे यातून या व अशा प्रकारच्या कला पुढे टिकू शकतात.

**संदर्भ -**

1. महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश मंडळ, मराठी विश्वकोश, खंड 12
2. Mandavkar Pavan, Indian Knowledge System (IKS), SSRN electronic journal, URL: https://papers.ssrn.com/sol3/papers.cfm?abstract_id=4589986
3. प्रत्यक्ष मुलाखत